ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI (Special Issue-I) Nov – Dec, 2023

OPEN ACCESS Original Research Article

# भारतीय राजकीय पक्षपद्धतीचे सामान्य स्वरूप

* प्रा. वासुदेव गोविंदा मेश्राम

*राज्यशास्त्र विभाग, एस.पी.डी.एम.महाविद्यालय , शिरपूर

**प्रस्तावना:**

राजकीय पक्ष हि एक विशिष्ट स्वरुपाची रचना असते. हि रचना सार्वत्रिक स्वरुपाची असते. राजकीय व्यवस्थेत अश्या रचनेचे अस्तित्व आवश्यक आणि महत्वाचे मानले जाते. आधुनिक राजकीय व्यवस्थेमध्ये राजकीय पक्ष हे जनताभिमुख असतात. राजकीय व्यवस्था कोणत्याही स्वरुपाची असली तरी राजकीय पक्ष हि एक महत्वाची यंत्रणा म्हणून सर्व राजकीय व्यवस्थेत राजकीय पक्षाला सर्वत्र मान्यता देण्यात आली आहे. प्रतिनिधिक लोकशाही शासन पद्धती असलेल्या शासन पद्धतीमध्ये राजकीय पक्षाची भूमिका महत्वाची असते. लोकशाहीप्रधान देशामध्ये पक्ष पद्धतीचे स्वरूप त्या देशातील राजकीय इतिहास ,सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमीवर अवलंबून असते. ‘‘समाजातील लोकांच्या काही गरजा असतात व त्या नुसार त्यांच्या काही मागण्या पण असतात. ह्या मागण्यानां स्पष्टता प्राप्त करून देणे आवश्यक असते. ह्या मागण्याची पूर्ती ह्या दृष्टीने विशिष्ट धोरण निश्चित करावे लागते. अश्या रीतींने मागण्याची स्पष्टता आणि त्यांचे एकत्रीकरण व त्यांची पूर्ती ह्या दृष्टीने निश्चित असे धोरण आखण्याकरिता राजकीय व्यवस्थेत जि एक राजकीय स्वरुपाची यंत्रणा असते. त्या यंत्रणेला राजकीय पक्ष असे म्हणतात.’’ १ राजकीय व्यवस्थेची स्थिरता व धेर्यपुर्ती करण्याकरिता जनतेच्या व्यवहाराला विशिष्ट वळण लावणे गरजेचे असते. लोकशाही प्रधान देशात बळजबरीने वळण लावणे शक्य नसते. अश्या परिस्थितीत नवीन मूल्यांच्या आधारावर लोकांना संघटीत करणे आवश्यक असते. या प्रकारची गरज राजकीय पक्ष पूर्ण करण्याचे कार्य करीत असतात. त्याचबरोबर अधिमान्यतेसाठी राजकीय पक्षाचे कार्य महत्वाचे असते. हुकुमशाही व्यवस्थेत राजकीय पक्ष व्यवस्थेला अधिमान्यता मिळवून देतात. ‘‘राजकीय पक्ष व विचारसरणी ह्यांची एक प्रकारची बांधिलकी असते .दुसरी कोणतीच विचारसरणी लोकांना स्वीकारता येत नाही.’’२ तर लोकतांत्रिक व्यवस्थेत लोकांच्या मागण्या स्पष्ट करणे आणि त्यानुसार राजकीय पक्षाचे धोरण ठरविण्याचे कार्य राजकीय पक्ष करतात. संक्रमणकाळात असणार्या राजकीय व्यवस्थेत राजकीय पक्ष जनतेच्या व्यवहाराच्या दृष्टीने नवीन रचना व नियम तयार करण्याचे कार्य करताना आढळतात. राज्यशास्त्रात राजकीय पक्षाच्या अभ्यासाला महत्वाचे स्थान आहे. राजकीय पक्षाच्या अभ्यासाचे महत्व वाढण्याची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे मांडता येतील आधुनिक राज्यशास्त्रात सत्ता हि संकल्पना महत्वाची आहे., राजकीय पक्ष जनसमूहाचे संघटन करतात जनसमुहाला कृतीप्रवण करून त्यांना सामुहिक कृती करण्यास प्रवृत्त करतात, त्याचबरोबर समाजातील व्यक्ती आणि विविध गटांना राजकारणासोबत जोडण्याचे कार्य करतात. विविध हितसंबंधी गट आणि दबावगट यांचाही

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI (Special Issue-I) Nov – Dec, 2023

OPEN ACCESS Original Research Article

प्रत्यक्ष अप्रत्यक्ष राजकीय पक्षासोबत संबंध असतो. राजकीयीकरनाची प्रक्रिया पण राजकीय पक्षाच्या माध्यामातून होताना आढळून येते, राजकारणाशी अलिप्त असलेल्यांना राजकीय प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचे महत्वाचे कार्य राजकीय पक्ष करतात. इत्यादी कारणामुळे राजकीय पक्षाच्या अभ्यासाला फार महत्व प्राप्त झाले आहे.

**Copyright © 2023 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**विश्लेषण:**

भारतीय राज्यघटनेत कोणत्याही राजकीय पक्षाचा स्पष्ट उल्लेख केलेला आढळत नाही. तरी भारतीय शासन व्यवस्थेत बहुपक्षीय पद्धतीचा उदय व विकास झालेला दिसून येतो. लोकशाहीप्रधान देशामध्ये पक्ष पद्धतीचे स्वरूप त्या देशातील राजकीय इतिहास ,सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमीवर अवलंबून असते. भारतात स्वातंत्र्य चळवळीतून उदयास आलेला कॉंग्रेस पक्ष १९६७ पर्यंत केंद्रात आणि राज्यपातळीवर सत्ताधारी असल्यामुळे भारतात एकप्रबल पक्ष पद्धती असल्याचे दिसून येते. ''दीर्घकाळपर्यंत एकाच राजकीय पक्षाची मक्तेदारी जबाबदार असा विरोधी राजकीय पक्ष निर्माण करण्याच्या दृष्टीने उपयुक्त कधीच नसते. '' ३ प्रबळ विरोधी राजकीय पक्षाचे असणे लोकशाही शासनाच्या दृष्टीने खूप महत्वाचे असते. भारत हा जगातील विशाल प्रजासत्ताक देश आहे.आपण द्विसदनात्म्क संसदीय शासन व्यवस्था स्वीकारली आहे. दोन्ही सभागृहात सत्ताधारी आणि विरोधी पक्ष निवडण्याची योजना आहे.संसदेत सत्ताधारी आणि विरोधी दोन्ही पक्षाची भूमिका महत्वाची असते. संसदीय लोकशाही पक्ष प्रणालीवरच अवलंबून असते. स्वातंत्र्यप्राप्तीच्या उद्देशाने कार्यरत असलेली राष्टीय कॉंग्रेस हीच स्वातंत्र्यानंतर राजकीय पक्षात परावर्तीत झाली.त्यास तुल्यबळ ठरू शकेल असा विरोधी पक्ष १९८९ पर्यंत निर्माण होऊ शकला नाही.प्रबळ विरोधी राजकीय पक्ष असेल तर सत्ताधारी पक्षाच्या हुकुमशाही प्रवृत्तीवर नियंत्रण प्राप्त करता येते. जनतेच्या मुलभूत प्रश्न व मागण्याकडे सरकारचे लक्ष वेधता येते. आणि सरकारच्या धेय्यधोरणात आवश्यक ते बदल घडवून आणता येते.'' सध्या भारतात आपल्या संकीर्ण पक्षीय स्वार्थासाठी राष्टीय हिताचा बळी देणे अंगवळणी पडले आहे.''४ सत्ताधारी पक्षाने हुकुमशाही पद्धतीने सत्ता वापरू नये. लोककल्याणकारी उपक्रमाकडे दुर्लक्ष करू नये ,शासना संबंधीत विविध नियम तयार करताना बेजबाबदार वागू नये.याकरिता विरोधी पक्ष आवश्यक असतो. राजकीय पक्ष हे देशहिताला व लोककल्याणास प्राधान्य देणारे असावेत असे अपेक्षित असते.परंतु अनेकदा देशहितापेक्षा पक्ष हित महत्त्वाचे समजले जाते.

भारतीय संविधानाने आपल्या नागरिकांना संघटीत होण्याचे आणि आपले विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे , त्यातूनच बहुपक्षीय पद्धतीचा विकास झालेला आढळून येतो. भारतीय पक्ष पद्धतीचे विशिष्ट प्रकारात ठामपणे वर्गीकरण करता येत नाही , भारताने पाश्चिमात्य शासन पद्धतीचा स्वीकार केलेला असला तरी पाश्चिमात्य पक्षपद्धती येथे विकसित होऊ शाली नाही.त्याचे कारण म्हणजे ''

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI (Special Issue-I) Nov – Dec, 2023

OPEN ACCESS Original Research Article

तिकडच्या सारख्या पक्षपद्धतीची उणीव हि अशीच एक गोष्ट आहे. ज्या समाजात राजकीय व्यवस्था उत्क्रांत होत जाते त्या समाजात विचारसरणीना क्रमशा आकार प्राप्त होत जातो. आणि एकएका विचारसरणीमधून पक्ष आकाराला येत जातात" ५ त्यामुळे येथील राजकीय पक्षात विस्कळीतपण आणि एकसारखेपणा,निश्चित सुसंगत दिसत नाही.पक्षांतर योग्य तत्वावर होत असेल तर त्याला अमान्य करता येत नाही परंतु वर्तमान काळात पक्षांतराची करणे स्वार्थावर आधारित आहेत त्यात विचार निष्ठा दिसत नाही.अनेकदा निवडणुकीच्या काळात एकीकडे उमेदवारी अर्ज भरणे सुरु असते तर दुसरीकडे अनेक नेते मंडळी एकापक्षातून दुसर्या पक्षात पक्षांतर करताना आढळून येतात. भारतामधील राजकीय पक्षाच्या कामकाजात कुठल्याही विशिष्ट प्रकारचे सूत्र आढळत नाही. त्याचबरोबर सातत्य व सुसंगती आढळत नाही. यामागचे कारण म्हणजे स्वातंत्र्य पूर्व काळात वेगवेगळ्या विचारधारेवर आधारित पक्ष निर्माण झाले नाही. रिचर्ड एल. पार्क म्हणतात ''स्वातंत्र्य चळवळ एकूणच पाश्चिमात्य धर्तीच्या पक्ष पद्धतीला जन्म देण्यास प्रतिकूल ठरते. साम्राज्यावादी सत्ताधीशाला विरोध करण्यासाठी व स्वातंत्र्याप्राप्तीसाठी सगळे गट कटिबद्ध होऊन एका संघटनेत जमतात....पुन्हा स्वातंत्र्यप्राप्ती नंतर ते फुटतात.....त्यांच्यातून लहान लहान राजकीय वर्तुळे निर्माण होतात. ''६ कॉंग्रेस चा उदय स्वातंत्र्य चळवळीतून झाला.स्वातंत्र्यपूर्व काळात एक दबावगटाचे स्वरूप होते ,स्वातंत्र्या नंतर त्याला एका राजकीय पक्षाचे स्वरूप प्राप्त झाले. ''भारतातील सर्वच महत्वाच्या पक्षांचा उगम कॉंग्रेसमधून झालेला आहे. ''७ . १९४८ मध्ये श्री.जयप्रकाश नारायण आणि श्री. अशोक मेहता यांच्या नेतृत्वात समाजवादी पक्ष स्थापन झाला.१९५१ मध्ये आचार्य कृपलानी यांनी किसान मजूर प्रजा पक्षाची स्थापना केली[प्रजा समाजवादी]. श्री. चक्रवर्ती राजगोपालचारी यांनी १९५९ साली स्वतंत्र पक्ष स्थापन केला. १९०६ मद्ये मुस्लीम लीग स्थापन झाली होती त्यास प्रत्युत्तर म्हणून १९१६ मध्ये हिंदू महासभा हा पक्ष स्थापन झाला. तर कॉंग्रेसी परंपरेपासून वेगला स्वतंत्र मजूर पक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात १९३६ ला स्थापन झाला होता. असे अनेक पक्ष स्थापन झाले असले तरी कॉंग्रेस सी स्पर्धा करू शकेल एवढी ताकत कोणताही पक्ष प्राप्त करू शकला नाही.१९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकांपासून १९७१ च्या लोकसभा निवडणुका पर्यन्तचा कालखंड सोडल्यास जवळपास कॉंग्रेसची एकछत्री सत्ता होती.त्यामुळे या काळात एकप्रबल पक्षपद्धती होती असे म्हटले जाते. याशिवाय विरोधी पक्षाच्या मर्यादा ,जनतेवर आपल्या विचारांचे संस्कार कोणताच राजकीय पक्ष जाणीवपूर्वक कताना आढळत नाही. १९६७ ते १९७१ हा काळ विरोधी पक्ष्याच्या दृष्टीने महत्वाचा काळ होता. या काळात जनतेमध्ये आपले स्थान , पाया विस्तारण्याची संधी होती. पण ते सर्व अल्पायुषी ठरले.याशिवाय राजकीय पक्षात स्वतंत्र वेगळेपणा आढळत नाही. '' सत्ताधारी आणि विरोधी हे दोन्ही पक्ष सारख्याच तत्वांचा व मूल्यांचाच नव्हे तर साध्य आणि साधनांचाही पुरस्कार करताना दिसतात ''८

विशिष्ट व्यक्ती संबंधी लोकांमध्ये एक विशिष्ट प्रकारची भावना निर्माण करून त्या व्यक्तीचे व्यक्तीवलय जनतेसमोर आणण्याचे कार्य काही राजकीय पक्ष करताना दिसतात. विशिष्ट व्यक्तीसंबंधीची भावना हि काही गोष्टीवर अवलंबून

असते. अनुयायांचे स्वरूप कशाप्रकारचे आहे हि गोष्ट याबाबतीत फार महत्वाची असते. या मध्ये स्तुतिपाठक ,अंधश्रद्ध लोक आणि प्राप्त झालेले राजकीय लाभ कायम रहावेत भावना बाळगणाऱ्या लोकांना विशिष्ट व्यक्तीसंबंधी व्यक्तिवलयाची भावना निर्माण करणे सोपे जाते. त्याच बरोबर राजकीय पक्षाच्या संघटनेत नेता व अनुयायी ह्या दोघात कश्या प्रकारचे संबंध आहेत यावरही व्यक्तिपूजेची भावना निर्माण होत असते. या व्यक्तीनिष्ठेची काही उदाहरणे भारतीय राजकीय पक्षात आढळून येतात त्या मध्ये श्री. पंडित जवाहर नेहरू ,श्रीमती इंदिरा गांधी यांचा उल्लेख करता येईल. विचारसरनीपेक्षा व्यक्तिपूजेला राजकीय पक्षात महत्व जास्त दिसून येते. ''परंपरे नुसार अजूनही या देशातील संघटना या व्यक्ती भोवतीच उभारल्या जातात व फिरत राहतात. याला भारतातील कोणताच पक्ष अपवाद नाही. '' ९ त्यामुळे प्रत्येक राजकीय पक्षात एकापेक्षा जास्त प्रभावकेंद्र दिसतात. एक गट पक्षातील महत्वाच्या पदावर विराजमान असतो तर दुसरा गट वंचित आणि असंतुष्ट असतो., निवडणुकीच्या काळात असे असंतुष्ट गट मुळ राजकीय पक्षातून बाहेर पडतात , कॉंग्रेस पक्षातून श्री.शरद पवार यांनी राष्ट्रवादी पक्ष स्थापन केला आहे , त्याचबरोबर नेतृत्वाच्या वारसदारीचा प्रश्न सर्वच पक्षांना कमीअधिक प्रमाणात लागू आहे. जितके नेते तितके गट निर्माण होतात , नेतृत्वाच्या महत्वाकांशामुळे पक्ष फुटतात व नेतृत्व ठरवेल त्या राजकीय पक्षासोबत आघाडी करताना आढळून येतात. त्यामुळे भारतीय पक्ष पद्धती बहुपक्षीय आहे व अनेक वर्ष पर्यंत ती बहुपक्ष पद्धतीच राहण्याची सम्भावना आहे. याव्यतिरिक्त अनेक प्रादेशिक पक्षाचे अस्तित्व आढळून येते.

भारतीय राजकीय पक्ष अंतर्गत रचना हि लोकशाही वर आधारभूत असलेली आढळत नाही.वेळोवेळी पक्षांतर्गत निवडणुका होत नाही किंवा झाल्या तरी त्या मध्ये औपचारिकतेच प्रमाण जास्त असते. राजकीय पक्षात विचार भिन्नता असली तरी संधिसाधू प्रवृत्ती दिसते.एकमेकांचे विरोधी पक्ष हि सत्ता प्राप्तीसाठी सर्व विधिनिषेध बाजूला सारून एकत्र येताना दिसून येतात. भारतीय पक्षपद्धतीमध्ये सांप्रदायिक आणि प्रादेशिक पक्षाचा जोर वाढताना दिसून येतो.राजकीय पक्ष आपल्या हेतुसिधीसाठी आर्थीक , सामाजिक प्रश्नास महत्व न देता जात , धर्म आधारावर निवडणुका लढवण्याचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर राजकीय पक्षात गुन्हेगारीप्रवृत्ती धारण केलेल्या , अनेक गंभीर गुन्हे दाखल असलेल्या व्यक्तींना पक्षीय राजकारणात स्थान प्राप्त होत असताना आढळून येते. १९६७ पूर्वी कॉंग्रेस चीच सत्ता असली तरी कॉंग्रेस व्यतिरिक्त अनेक राजकीय पक्षाचे अस्तित्व असल्याचे आढळून येते. १९९० नंतरच्या काळात भारताने जागतिकीकरणाचा स्वीकार केल्याने राजकीय पक्षाच्या पारंपरिक विचारधारा, जनतेचे प्रश्न, अस्मिता, संरचना, सत्तेतील भागीदारी, पक्ष्याची धोरणे, निवडणूक आघाडी अश्या अनेक घटकांनी राजकीय पक्षाच्या स्वरुपात बदल घडून आलेला दिसून येतो.

**निष्कर्ष:**

राजकीय पक्ष अनेक महत्वाची कार्ये करताना दिसून येतात , त्यामध्ये आपल्या राजकीय पक्षाचा जनाधार वाढावा याकरिता कार्यकर्त्याची भरती करणे आणि निवडणुकांसाठी योग्य, पात्र उमेदवारांची निवड करणे ,जनतेच्या मागण्या संकलित करुन त्यानुसार धोरणे निश्चित करणे, लोकांच्या

राजकीय जीवनाच्या दृष्टीने त्यांचे विविध माध्यमातून राजकीय सामाजीकरण घडवून आणणे. राजकीय सामाजीकरण दोन दृष्टीने केले जाते. त्यात प्रस्थापित राजकीय संस्कृती सुदृढ होईल या दृष्टीने लोकांच्या सामाजिक व राजकीय व्यवहारांना योग्य ते वळण लावणे आणि त्यांच्याकडून आवश्यक ती कार्य करून घेणे. पारंपारिक व्यवस्था श्रद्धा व प्रथा कायम टिकली पाहिजे असा प्रयत्न केला जातो. नवीन ज्ञान, विज्ञान यास पूर्णपणे विरोध न करता पारंपारिकता जोपासण्याचा प्रयत्न असतो.भारतात या दृष्टीने कार्य करणाऱ्या पक्षांना उजवे राजकीय पक्ष म्हटले जाते. तर या विरुद्ध प्रस्थापित राजकीय संस्कृती ,परंपरा नाकारून नवीन संस्कृती , परंपरा , मुल्ये आधारित व्यवस्था निर्माण करण्याच्या हेतूने सामाजीकरण केले जाते त्या पक्षांना डावे राजकीय पक्ष म्हटले जाते. भारताच्या संदर्भात या बाबतीत निश्चित भेद करता येत नाही कारण डाव्या उजव्या दोन्ही प्रकारच्या भूमिका घेताना पक्ष दिसून येतात. पारंपारिक अर्थाने भारतीय पक्ष पद्धतीत राजकीय पक्षाचे वर्गीकरण करणे कठीण आहे.तरी भारतीय निवडणूक आयोगाने काही विशिष्ट अटींवर वर्गीकरण केलेले आढळून येते.त्यात राष्टीय राजकीय पक्ष ,राज्य पक्ष आणि नोंदणीकृत पक्ष असे वर्गीकरण केलेले आढळून येते. भारतीय निवडणूक आयोगाच्या मे २०२३ च्या नवीन प्रकाशनानुसार वर्तमानात एकूण ६ राष्टीय पक्ष आहेत.राष्टीय पातळीवर कार्य करणाऱ्या पक्षांना राष्टीय पक्ष म्हणतात. त्यांना खालील निकष पूर्ण करणे आवश्यक असते.

१. किमान चार राज्यामध्ये शेवटच्या लोकसभा निवडणुकीत किंवा विधानसभेच्या निवडणुकीत किमान सहा टक्के मत मिळणे आवश्यक किंवा किमान चार सभासद लोकसभेत निवडून येणे अपेक्षित आहे.
२. आधीच्या लोकसभेच्या निवडणुकीत किमान तीन राज्यांमध्ये मिळून लोकसभेच्या एकूण जागांपैकी दोन टक्के जागा निवडून येणे आवश्यक असते.
३. किमान चार राज्यांमध्ये राज्यपातळीवरील पक्ष म्हणून मान्यता मिळणे आवश्यक असते.

याशिवाय सद्या एकूण ५५ राज्य पक्ष आणि २५९७ नोंदणीकृत पक्ष आहेत.

**आधारभूत संदर्भ सूची:**


१. प्रा.तिजारे रा. अं., प्रा. डॉ. पेशवे व. मा. आधुनिक राजकीय सिद्धांत , श्री.मंगेश प्रकाशन ,नागपूर ,एप्रिल १९७९, पा. नं.२२९
२. प्रा.तिजारे रा. अं., उपरोक्त १९७९, पा. नं.२३३
३. प्रा.तिजारे रा. अं., उपरोक्त १९७९, पा. नं.२३० ,२३१
४. गुहा रामचंद्र , राजकारणातील सुसंस्कृत्ता गेली कुठे , लोकमत, २८.८.२०१४
५. प्रा भोले भास्कर लक्ष्मण ,गणराज्याचे शासन आणि राजकारण ,पिंपळापुरे प्रकाशन ,नागपूर ,२००३ पा. नं.४१
६. प्रा.भोले भास्कर लक्ष्मण ,डॉ.देशपांडे ना.र.,भारताचे शासन आणि राजकारण ,पायल प्रकाशन नागपूर ,१९७४ पा. नं.३९५
७. प्रा.भोले भास्कर लक्ष्मण ,उपरोक्त १९७४ पा. नं.३९६
८. प्रा.भोले भास्कर लक्ष्मण ,उपरोक्त १९७४ पा. नं.३९७
९. प्रा भोले भास्कर लक्ष्मण ,उपरोक्त ,२००३ पा. नं.४१

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

*Volume–XII, Issue– VI (Special Issue-I)* *Nov – Dec, 2023*

OPEN ACCESS Original Research Article

१०. प्रा.भोले भास्कर लक्ष्मण ,डॉ.देशपांडे ना.र.,भारताचे
शासन आणि राजकारण ,पायल प्रकाशन नागपूर १९७४
पा. नं.४००

***Cite This Article:***

Prof. Meshram V.G. (2023). भारतीय राजकीय पक्षपद्धतीचे सामान्य स्वरूप. In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal: Vol. XII (Number VI, pp. 40–45). Zenodo. https://doi.org/10.5281/zenodo.10474496